# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 09/2022 दिनांक : 06.01.2022

# 1)खुनः—

**1)विमानतळ :—**दिनांक 05.01.2022 रोजी चे 19.00 ते 19.15 वा. चे दरम्यान, **राज रेसिडेन्सि अपार्टमेंट चे समोर रोडवर शारदानगर नांदेड येथे,** यातील **मयत नामे विशाल रमेश धुमाळ, वय 22 वर्षे, रा. तलाठी कॉलनी रामनगर नांदेड**, यास यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन आरापी क्र 1 हा आठ महीन्यापुर्वी देवस्थान हदगाव येथील देवदर्शन करुन मो सा वरुन परत येत असतांना अपघात होवुन हाताला दुखापत होवुन डावा हात फॅक्चर झाल्याने त्या वेळी मयताचे वडील यांनी त्याचा उपचाराचा खर्च फिर्यादीने केलेला होता. तरीही त्यानंतर आरोपी क्र 1 याने फिर्यादीचा मोठा मुलगा मयत विशाल याच्याकडे जास्तीचे नुकसान भरपाईसाठी वीस हजर रुपये पान टपरी टाकन्यासाठी देणे बाबत तगादा लावला या कारणावरुन मयत हा मो सा वरुन जात असतांना नमुद तीन आरोपीतांनी पाठीमागुन ट्रिपल सिट मो सा वरुन येवुन मयतास थांबवुन त्याचेवर खंजरने वार करुन त्यास गंभीर जखमी करुन खुन केला. वगैर **फिर्यादी रमेश सखाराम धुमाळ, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी क्लार्क कृर्षी उत्पन्न बाजार समीती नवा मोंढा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 02/2022 कलम 302, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री अनलदास, मो.नं. 7020201376** हे करीत आहेत.

**2)उमरी :—**दिनांक 05.01.2022 रोजी चे 12.00 वा. चे सुमरास, **ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेर मनुर ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे धोंडु शंकर पोलावार, वय 70 वर्षे, रा. मनुर ता. उमरी जि. नांदेड**, यास यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन स्वत धान्य दुकानाचे विरोधात दिलेल्या तक्रारीची चौकशी करीता आलेल्या तहसिल कार्यालयातील अधिकाऱ्याकडे मयत हा जबाब देण्यासाठी ग्राम पंचायत कार्यालयात जात असतांना आरोपीतांनी मयतास ग्राम पंचायत कार्यालयात जावु न देता त्यास ढकलुन खाली पाडुन लाथा बुक्यानी मारहाण केल्याने मयताचे डोक्यात गंभीर मार मारुन खुन केला. वगैर **फिर्यादी बालाजी धोंडु पोलावार, वय 21 वर्षे, व्यवसाय किराणा दुकान रा. मनुर ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 04/2022 कलम 302, 143, 147, 149, 341, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री एस. डी. भोसले, मो.नं. 7038833358** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :—

**इतवारा :—**दिनांक 04.01.2022 रोजी चे 22.00 ते दि.05.01.2022 चे 10.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे मोबईल शॉपीचे दुकान फेमस फंक्शन हॉलचे समोर देगलुर नाका नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा नेहमी प्रमाणे दुकान बंद करुन घरी गेला असता रात्री कोणीतरी अज्ञात चोरटयाने दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन दुकानातील नगदी 8,000/—रु व एचपी कंपणीचे जुने प्रिंटर किंमती 7000/—रुपयाचे व दुरुस्तीसाठी आलेले पाच जुने मोबाईल किंमती अंदाजे 10,000/—रु व नवीन मोबाईल किंमती 16,000/—रुपयाचे व गल्यातील नगदी 10,000/—रु असा एकुण 51,000/—रुपयाचा माल चोरुन नेला व दुकानातील आईसक्रिमचे सामान आस्ताव्यस्त फेकुन देवुन नुकसान केले. वगैरे **फिर्यादी आमेरखान पि. आयुबखान, वय 26 वर्षे, व्यवसाय व्यापार देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 08/2022 कलम 454, 457, 380, 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1991 वाकडे**, **मो.क्र. 9130642320** हे करीत आहेत.

## 3)गोडावुन मधील चोरी :–

**भोकर :–**दिनांक 04.01.2022 रोजी चे 20.00 ते दि .05.01.2022 चे 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे गोडावुन बटाळा रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी चे गोडावूनचे शटरचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन गोडावून मधील अंदाजे तीन क्विंटल कापुस किमती 28,500/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी महेमुद बेग अमीर बेग, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. अशोकनगर भोकर, ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 04/2022 कलम 461,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2078 लक्षटवार**, **मो.क. 9767114720** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**भोकर :–**दिनांक 04.01.2022 रोजी चे 20.00 ते दि .05.01.2022 चे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे व साक्षीदारचे शेतातुन मौजे रायखोड शिवारात ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी शेतातील जुने वापरते तीन स्टाटर किंमती 8,000/– रुपयाचा तसेच अडीच इंचाचे 47 पाईप किंमती 37,600/– रुपयाचे असा एकुण 45,600/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी किशन दत्ता बुध्देवाड, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. रायखोड, ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 07/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/487 कदम**, **मो.क्र. 9763356368** हे करीत आहेत.

## 5)मोबाईल चोरी :–

**भाग्यनगर :–**दिनांक 04.01.2022 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **स्नेहनगर पोलीस वसाहत गेट नं. 02 जवळ नॅनोकार मध्ये,** यातील फिर्यादी आपली नॅनोकार एम.एच. 26 व्ही 6097 उभी करुन चहा पिण्यासाठी गेला आसता कारमधील रेडमी नोट 8 प्रो मोबाईल किंमती 18,000/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी प्रियतम भास्कर चौदंते, वय 29 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. स्नेहनगर पोलीस वसाहत अवरली बिल्डींग घर नं. 5, नांदेड ता.जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 07/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/614 सातारे**, **मो.क्र. 9823170905** हे करीत आहेत.

## 6)मो. सा. चोरी :–

**1)भोकर :–**दिनांक 04.01.2022 रोजी चे 11.05 वा. ते 11.15 वा. चे दरम्यान, **किनवट रोड बालाजी कृषीसेवा केंद्र दुकाना समोर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची सी.बी. शाईन कंपनीची मो सा क्रं. एमएच–26/बीपी–1781 किंमती 50,000/–रुपयाची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी संदिप पांडुरंग कुंभरवाड, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. रिठ्ठा ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 05/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री कराड, मो.क. 9552500385** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 05.01.2022 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **एसबीआय बॅक शिवाजीनगर समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो मो सा क्रं.एमएच–26/एयु–5409 किंमती 25,000/–रुपयाची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शेख जावेद शेख गौस, वय 39 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. नई आबादी, नांदेड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 11/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/श्री केंद्रे**, **मो.क. 9921333990** हे करीत आहेत

## 7)विवाहीतेचा छळ :–

**मुक्रमाबाद :–** दिनांक 30.04.2016 रोजी सकाळी 11.30 वा. दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व माहेरी कोटग्याळ/डोरनाळी ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करुन मोटार सायकल घेण्यासाठी माहेरुन एक लाख रुपये घेवुन ये म्हणुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरनं 05/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1677 शेख ताहेर**, **मो.क्र. 8421837070** हे करीत आहेत.

## 8)अपघात :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 28.12.2021 रोजी 23.30 वा. चे सुमारास, **वाल्मीक चौक ते दुध डेअरी चौक चे मध्ये हनुमान मंदीर जवळील जिम समोर रोडवर नांदेड ता.जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा मयत वैभव गुलाबराव लोहकरे** हा मो.सा. क्र. एमएच/26–क्यु–2826 वर बसुन चौफाळा नांदेड येथुन घराकडे येत असताना मोसा क्र. एमएच/05–बीए–4054 चा चालकाने त्याचे ताब्यातील मो.सा. हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास पाठीमागुन जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी गुलाब नागोराव लोहकरे वय 50 वर्षे व्यवसाय ॲटो चालक रा. शाहुनगर वाघाळा हडको, नांदेड ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 16/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/एम.डी.हंबर्डे, मो.क्र. 9823040224**

## 9)जुगार :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 05.01.2022 रोजी चे 16.45 वा. चे सुमारास, **चंदासिंग कॉर्नर महाराष्ट्र हॉटेल,नांदेड ता.जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1270/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/2434 प्रमोद गोविंदराव कऱ्हाळे, ने. नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 15/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1884 मुपडे, मो.क्र. 8421435353** हे करीत आहेत.

## 10)गळफास घेवुन मृत्यु :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 04.01.2022 रोजी चे रात्री 21.00 ते दि. 05.01.2022 रोजी चे सकाळी 06.00 चे पुर्वी, **सतीश ठाकुर यांचे शेतात, मौ. बाभुळगाव शिवारात ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे रावसाहेब शंकरराव पांचाळ, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड**, हा रात्री जेवन करुन शेतात झोपण्यासाठी गेला व लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैर **खबर देणार दशरथ शंकर पांचाळ, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. 02/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2168 शेख जावेद, मो.नं. 8999978576** हे करीत आहेत.

## 11)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**भोकर :–**दिनांक 05.01.2022 रोजी चे 07.00 वा. चे सुमारास, **मोघाळी बसस्थानक जवळ झाडावर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे रावण सकरु जाधव, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. जाकापुर ता. भोकर जि. नांदेड**, हा शेळयांना चारा आणतो म्हणुन शेवरीच्या झाडावर जावुन चारा काढत असतांना त्या झाडाची एक फांदी तोडली ती फांदी मोठया लाईनच्या तारावर पडल्याने इलेक्ट्रीक शॉक लागुन मरण पावला. वगैरे **खबर देणार आत्माराम सकरु जाधव, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. जाकापुर ता. भोकर जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भोकर** आ. मृ. 06/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/487 कदम, मो.नं. 9763356368** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड